बावीसावी

आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील स्त्री कर्तृत्वाचे योगदान

## भाग २


संपादक

डॉ.स्नेहल तावरे

डॉ. शिवलिंग मेनकुदळे

डॉ. संजय नगरकर

डॉ. सविता पाटील



स्नेहवर्धन प्रकाशन

पुणे

ଔ **स्नेहवर्धन प्रकाशन :** क्र. १३०१

ଔ देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील स्त्री कर्तृत्वाचे योगदान
भाग - २
(समीक्षा - संदर्भ)

ଔ **प्रकाशक आणि मुद्रक**
डॉ. एल.व्ही. तावरे
स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ,
महात्मा फुले सभागृहामागे, पुणे ४११ ०३०
स्थिरसंवाद: (०२०) २४४७ २५ ४९ /२४४ ३६ ९६१
भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१/९०७५०८१८८८
ई मेल : snehaltawre@gmail.com

ଔ **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

ଔ © S.R. I.

ଔ **प्रथमावृत्ती :** १५ डिसेंबर २०१९
२२ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

ଔ **अक्षरजुळणी :** सुनीता पारनेरकर, पुणे

ଔ **मुद्रणस्थळ :** स्मिता प्रिंटिंग प्रेस, पुणे

ଔ **ISBN** 978-93-87628-75-5

ଔ **पृष्ठसंख्या :** १७०

ଔ **मूल्य : ₹ २५०**
**$ 3**

*विश्वाची मूलाधार असलेल्या,*
*कोणत्याही परिस्थितीला खंबीरपणे*
*तोंड देणाऱ्या, अष्टावधानी असलेल्या*
*समस्त स्त्री शक्तीला*
*आदरपूर्वक सस्नेह अर्पण...*

**- डॉ.स्नेहल तावरे**
**- डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
**- डॉ. संजय नगरकर**
**- डॉ. सविता पाटील**

# अनुक्रमणिका
## भाग - २


| | | | |
|---|---|---|---|
| ● | **संपादकीय** | **- डॉ.स्नेहल तावरे**<br>**- डॉ. शिवलिंग मेनकुदळे**<br>**- डॉ. संजय नगरकर**<br>**- डॉ. सविता पाटील** | .. ९ |
| १. | महान समाजसेविका : मदर तेरेसा | **- डॉ. नागोबाराव भुरके** | ..११ |
| २. | आनंदवनातील अनाथांची आई : साधनाताई आमटे | **- डॉ. मधुकर पवार** | ..१४ |
| ३. | स्वातंत्र्य चळवळीतील भारतीय महिलांचे योगदान | **- डॉ. अंबादास मंजुळकर** | ..१८ |
| ४. | स्थानिक शासनातील महिलांची भूमिका | **- डॉ . राहुल पंडित** | ..२२ |
| ५. | काव्यप्रांतातील मोहरांचा हंडा : बहिणाबाई चौधरी | **- डॉ. पांडुरंग भोसले** | ..२६ |
| ६. | श्रीमती ॲनी बेझंट : राजकीय व सामाजिक विचारातील योगदान | **- डॉ . अशोक चोथे** | ..३० |
| ७. | नजूबाई गावित (साहित्य क्षेत्र) | **- डॉ. माहेश्वरी गावित** | ..३३ |
| ८. | थोर महिला मार्गारेट थॅचर (१९२५-२०१३) | **- डॉ.मालिनी वडतकर** | ..३७ |
| ९. | बंडखोर लेखिका : ताराबाई शिंदे | **- डॉ. सीमा नाईक-गोसावी** | ..४१ |

१०. भारतीय स्त्री कर्तृत्वाचे योगदान - **डॉ. रंजना पाटील** ..४५

११. सरोजनी बाबर यांचे लोकसाहित्य क्षेत्रातील योगदान - **डॉ. वैभवी देहूकर** ..४९

१२. पंडिता रमाबाईंचे स्त्रियांविषयी लोकजागृतीचे कार्य - **डॉ. एस.एल. म्हात्रे** ..५३

१३. एक संघर्षमयी सरिता - मेधा पाटकर - **डॉ. विजया पवार** ..५७

१४. सिमोन द बोव्हुआर : द सेकंड सेक्स - **डॉ. भारती रेवडकर** ..६१

१५. सिंधुताई सपकाळ यांचे सामाजिक योगदान - **प्रा.डॉ.पोपट सिनारे** ..६५

१६. अहिल्याबाईंचा इतिहास : वास्तव आणि विपर्यास - **डॉ. काशिनाथ सोलनकर**..६९

१७. जानकीबाई आपटे यांचे अहमदनगरमधील सामाजिक कार्य - **डॉ. मीना साळे** ..७२

१८. व्यासंगी विदुषी : दुर्गा भागवत - **डॉ. प्रकाश सूर्यवंशी** ..७६

१९. पहिल्या धर्मचिकित्सक : मुक्ता साळवे - **डॉ. संगीता पैकेकरी** ..८०

२०. बहिणाबाईंची गाणी : बहिणाबाई चौधरी - **डॉ. चंद्रसेन आवारे** ..८४

२१. अखंड सेवाव्रती : मदर तेरेसा - **डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे** ..८९

२२. ताराबाई शिंदे यांचे वाङ्मयीन मूल्यमापन - **डॉ. वैशाली भालसिंग** ..९३

२३. कल्पना चावला : आकाशाला गवसणी घालणारी स्त्री - **डॉ. प्रतिमा कदम** ..९७

२४. अहिल्याबाई होळकर : एक संघर्षगाथा - **डॉ.संदीप वाकडे** ..१००

२५. महाराष्ट्राच्या लोकशिक्षिका : संत जनाबाई - **डॉ. सुमंगला बाकरे** ..१०४

२६. अहमदनगरमधील बीजमाता : राहीबाई पोपेरे - **डॉ. संदीप कदम** ..१०८

२७. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले एक बहुमुखी व्यक्तित्व - **प्रा. प्रवीण घोडविंदे** ..११०

२८. वीणा गवाणकर यांचे योगदान - **डॉ. उज्ज्वला भोर** ..११४

२९. ज्ञानज्योती सावित्रीमाता जोतीराव फुले - **डॉ. सुखदेव कोल्हे** ..११८

३०. सुधा मूर्तींचे सामाजिक कार्य - **डॉ. नवनाथ येठेकर** ..१२२

३१. रणरागिणी, पुण्यश्लोक लोकमाता : अहिल्याबाई होळकर - **डॉ. तानाजी पाटील** ..१२६

३२. कृषिकन्या बहिणाबाई चौधरी - **प्रा. प्रमोद शेटे** ..१३०

३३. परसबागेच्या प्रणेत्या : ममताबाई भांगरे - **प्रा.चिंतामण धिंदळे** ..१३४

३४. राहीबाई पोपेरे : आदिवासी महिलेचे जैवविविधा संवर्धनासाठी योगदान - **प्रा. डी. खोकले** ..१३७

३५. मदर तेरेसा यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान - **डॉ. वसंत गावडे** ..१४१

३६. कर्तबगार नगरसेविका : प्रा. सौ.ज्योस्ना गजानन एकबोटे - **डॉ. वैजयंतीमाला जाधव** ..१४५

३७. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य - **डॉ. दत्तात्रय चौधरी** ..१४९

३८. सावित्रीबाई फुले यांचे साहित्यिक योगदान - **डॉ. मीना आहेर** ..१५३

जवाहरलाल नेहरू पुरस्कार, युनेस्को शांतता पुरस्कार, भारत शिरोमणी अशा प्रकारचे अनेक पुरस्कार देऊन संपूर्ण जगाने त्यांना गौरविले. अनेक विविध मान्यवर विद्यापीठांनी त्यांना डॉक्टरेट ही सन्माननीय पदवी दिली. 'ऑर्डर ऑफ मेरीट' हा ब्रिटिश पुरस्कार राणी दुसरी एलिझाबेथ हिने २४ नोव्हेंबर १९८३ साली त्यांच्या मानवतेच्या श्रेष्ठ सेवेबद्दल त्यांना दिला. मदर तेरेसा यांचे अनेक विचार स्फुटलेखांद्वारे 'ए गिफ्ट फॉर गॉड' या पुस्तकात संकलित केले आहेत. 'मदर ऑफ द मॅन काइंड' म्हणूनच तिच्या ठायी वसत असलेल्या मातृत्वाचा भावनेला गौरवाने उल्लेखण्यात येते. त्यांचे सेवाकार्य अति श्रमाचे आणि कष्टाचे होते. पीडितांना प्रेम देऊन त्यांचे जीवन सुसह्य करण्याचा त्यांचा प्रयत्न जगात मान्य झाला आहे. अपरिमित अखंड कष्ट म्हणजे मदर तेरेसा असे समीकरण झाले आहे. एकूणच हे पुरस्कार म्हणजे खऱ्या अर्थाने त्यांच्या कार्याचा खरा गौरवच होता. पण त्यांनी केलेले देदिप्यमान कार्य या पुरस्कारांपेक्षा कितीतरी पटींनी अनमोल आहे.

भारतात (१९६५) मध्ये शांतिसागर ही कुष्ठरोग्यांची वसाहत मदर तेरेसा यांनी उभी केली.तर (१९७६) मध्ये आशादान या संस्थेची स्थापना केली. पुढील काळात त्यांनी अनाथ बालके, अपंग, अंध, वृद्ध व निराधार, कुष्ठरोगी आदी, समाजातील दीन दुबळ्या व उपेक्षित घटकांसाठी हजारो केंद्र सुरू केली. भारतातच नव्हे तर जगातील विविध देशांत त्यांच्या सेवाकार्याची व्याप्ती वाढली. दुःखितांचे अश्रू पुसण्यासाठी, दुःख हलके करण्यासाठी मदर तेरेसा आवश्यकता भासेल तेथे धाव घेत होत्या. त्यांच्या या सेवा कार्यामुळेच जगातील महनीय व्यक्तींमध्ये त्यांचा समावेश झाला आहे.

युगोस्लाव्हियातून बाहेर पडताना जवळ फक्त पाच रुपये इतकीच रक्कम असणाऱ्या या विदुषीला पैशाची कमतरता कधीच भासली नाही. प्रेम, उत्कट इच्छा, परिश्रम, प्रभूवर नितांत श्रद्धा यांमुळे त्यांच्या कार्याचा वटवृक्ष संपूर्ण जगभर खूप फोफावला, इवल्याशा रोपाचा वेल गगनावरी गेला. आधुनिक काळातील एक थोर व्यक्ती, थोर समाजसेविका, रंजल्या-गांजल्याची सेवा करणाऱ्या, माणसात देव शोधणारे असाधारण व्यक्तिमत्व म्हणजे मदर तेरेसा होय. गोरगरीब, अनाथ अपंग, रंजले गांजलेले, निराधार अंध, अनाथ बालके अशा लोकांना आपले समजून लेकरांप्रमाणे त्यांच्यावर माया, सेवा, प्रेम करणाऱ्याला संत किंवा साधू म्हणणेच उचित ठरेल. म्हणून तर त्या संतपदाला पोहोचल्या.

मदर तेरेसा यांनी आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत आपल्या सेवा कार्यात खंड पडू दिला नव्हता. त्यांच्या या कामात कधी वयाचा किंवा प्रकृतीचा अडथळा आला नव्हता.अशी ही 'भारतरत्न' दीनदुबळ्यांची अनाथांची, निराधारांची माता ५ सप्टेंबर १९९७ ला प्रभूच्या चरणी विलीन झाल्या



## कर्तबगार नगरसेविका : प्रा. सौ.ज्योत्स्ना गजानन एकबोटे

- डॉ. वैजयंतीमाला जाधव

पुणे महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या अध्यक्षपदी ४ मे २०१९ रोजी मा. प्रा. ज्योत्स्ना गजानन एकबोटे यांची नियुक्ती झाली आणि एका नवीन पर्वाला सुरुवात झाली. या संधीचे सोने करीत मा. प्रा.सौ. ज्योत्स्ना गजानन एकबोटे यांनी महिला आणि बालकल्याण हे विषय केंद्रस्थानी ठेवून विकासकामांना सुरुवात केली. अगदी अलीकडच्या उदाहरणाने याला सुरवात करायची म्हटली तर कचऱ्यात टाकून दिलेल्या अवघ्या एक दिवसाच्या स्त्री अर्भकाला ज्या कचरावेचक महिलांनी जीवदान दिले त्यांचा सन्मान महापालिकेच्यावतीने स्वतः पुढाकार घेऊन मा. प्रा. ज्योत्स्ना गजानन एकबोटे यांनी केला. कचरावेचक महिलांनी दाखवलेली माणुसकी, त्यांची कामगिरी यांचा यथोचित गौरव पण त्यांनी केला. त्या निमित्ताने पुणे महानगरपालिकेची महिला व बालकल्याण समिती कचरावेचक महिलेच्या कार्याची दखल घेते हे या निमित्ताने निदर्शनास आले.

महापालिकेत महिला व बालकल्याण समितीच्या अध्यक्षा झाल्यावर मा.प्रा.सौ.ज्योत्स्ना गजानन एकबोटे यांनी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. महापालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये शहराच्या विविध भागातून नागरिक मोठ्या प्रमाणात आपल्या कामासाठी येत असतात. याशिवाय महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि लोकप्रतिनिधी यांची संख्यादेखील अधिक आहे. इमारतीच्या आवारामध्ये एखादी आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास तात्काळ उपचार मिळण्यासाठी कोणतीही सुविधा उपलब्ध नाही. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या इमारतीमध्ये तातडीने सुसज्ज प्रथमोपचार कक्ष आणि १०८ नंबरची ॲम्ब्युलन्स दररोज दिवसभर उपलब्ध करून देण्यात आली. महापालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये ५ हजारांपेक्षा अधिक अधिकारी आणि कर्मचारी दररोज काम करतात. याशिवाय येथे आपल्या विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांची संख्यादेखील मोठी असते.सध्याच्या धकाधकीच्या काळात बदलती जीवनशैली, धावपळ यांमुळे अनेक गोष्टींचा ताण येतो हे त्यांनी चाणाक्षपणे जाणले. भविष्यातील गंभीर दुर्घटना अथवा संभाव्य धोका टाळण्यासाठी महापालिकेच्या

इमारतीमध्ये त्वरित प्रथमोपचार कक्ष त्यांनी सुरू केला. शहरातील नागरिकांसाठी इतक्या बारकाईने विचार करणाऱ्या अध्यक्षा, महिला व बालकल्याण समितीला लाभल्या हे शहरवासियांचे भाग्यच म्हणावे लागेल. महानगरपालिकेच्या वैद्यकीय सहाय्य योजनेतून माजी नगरसेवकांच्या कुटुंबीयांनाही वैद्यकीय उपचार घेता यावेत यासाठीही त्यांनी निर्णय घेतला. महानगरपालिकेच्या माध्यमातून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या किंवा तिसऱ्या शनिवारी क्षेत्रीय कार्यालयाच्या स्तरावर आरोग्य शिबिर राबविण्याचा व त्याचा खर्च आरोग्य विभागाच्या खात्यांतर्गत करण्याची शिफारस त्यांनी केली आहे आरोग्य कार्यालयाकडील अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजना व शहरी गरीब योजनेअंतर्गत सभासदांना वैद्यकीय उपचार घेण्यासाठी औंध येथील रुग्णालयाचा समावेश करण्यासाठी त्या प्रयत्नशील आहेत.

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये लिटल लायब्ररी सुरू करण्याचा प्रथम मान त्यांना जातो. बागांमधील लहान मुलांची खेळणी असणाऱ्या विभागातही लिटल लायब्ररी सुरू केली जाणार आहे. याठिकाणी मुला-मुलींसाठी छोट्या टेबल खुर्च्यांचीही सोय असेल, ज्यावर वेगवेगळी चित्रे रेखाटलेली असतील. त्यामुळे मुलांमध्ये लायब्ररी बाबत उत्सुकता वाढेल. त्याशिवाय मोकळ्या जागेत बसूनही मुलांना पुस्तके चाळता येणार आहेत. तर मैदानी क्रीडाप्रकारांची प्रात्यक्षिके पाहून सरावाची संधीही तिथे उपलब्ध राहील. त्याचवेळी जंगल सफारी सारखा फिल यावा, यासाठी प्राणी-पक्षांचे छोटेखानी संग्रहालयही असेल. पुण्यामधील बाणेर येथील मुरकुटे गार्डन, जंगली महाराज रस्त्यावरील छत्रपती संभाजी महाराज उद्यान, सोमवार पेठेतील शाहू उद्यान, फुलेनगर येथील हुतात्मा स्मारक, भवानी पेठेतील संत रोहिदास गार्डन, वडगाव बुद्रुक येथील सिंहगड विकास उद्यान या सहा बागांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर ही लायब्ररी सुरू करण्यात येत आहे. वाचनाची आवड बालपणातच रुजवली तर देशाला प्रगतीच्या मार्गावर नेता येईल ही दूरदृष्टी समोर ठेवून हा प्रकल्प राबवण्यास सुरुवात केली. मुलांना लहान वयात वाचन, मैदानी खेळ आणि प्राणी-पक्ष्यांशी जोडून घ्यावे आणि मोबाईलला दूर ठेवावे या हेतूने ही संकल्पना राबविण्यात येणार आहे.

आजच्या धकाधकीच्या काळात माणूस स्वतःच्या आरोग्याकडे अक्षम्य दुर्लक्ष करत आहे. हे त्यांच्या चाणाक्ष दृष्टीने हेरले आणि मुलांसाठी वॉटर बेलची अभिनव संकल्पना त्यांनी राबवली. भारतात केरळ राज्याने नुकताच वॉटर बेलचा उपक्रम सुरू केला. त्याच धर्तीवर महाराष्ट्रात पुणे शहरात महानगरपालिकेच्या वतीने सर्व शाळांमध्ये पाणी पिण्याची आठवण करणारी घंटा सुरू करण्याचा ठराव त्यांनी तातडीने मंजूर केला आणि तसे आदेशही सर्व शाळांना देण्यात आले. केवळ महिला व बाल कल्याण समितीच्या अध्यक्षपदाचे काम खुर्चीत बसून न करता सर्वसामान्य माणसांमध्ये जाऊन त्यांच्या समस्या समजून घेण्याचा



प्रयत्न त्या करतात. त्या समस्यांचे नेमके स्वरूप काय आहे, त्यांची सोडवणूक कशाप्रकारे करता येईल यावर विचारमंथन करून मग त्यावर उपाययोजना त्या करतात. या उपाययोजनांचे स्वरूप दूरगामी असे असते. समस्यांचे पूर्णपणे निवारण झाल्याशिवाय त्या शांत बसत नाहीत. आज दररोज अनेक नागरिक आपल्या समस्या घेऊन त्यांच्याकडे येतात. त्या समस्या कधी महिलांशी निगडीत असतात, तर कधी सर्वसामान्यांच्या आरोग्याशी निगडित असतात. त्या समस्यांचे निवारण करत असताना या समस्या भविष्यामध्ये निर्माण होऊ नयेत म्हणून तशाच पद्धतीचे अनेक महत्त्वपूर्ण निर्णयही त्यांनी घेतले आहेत. महिला आणि बालकल्याण समितीच्या अध्यक्ष म्हणून काम करत असताना आपल्यातील कल्पकतेची आणि नावीन्याची जोड त्यांनी त्यांच्या कामाला दिली. महिला व बालकल्याण समितीच्या अनेक नवीन योजना राबवण्यात त्यांच्या अनुभवाचा, ज्ञानाचा खूप फायदा होत आहे. महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून शहरातील युवतींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण शहरातील सर्व क्षेत्रीय कार्यालयामार्फत देण्याचे नियोजन त्यांनी केले आहे. पुणे शहरातील शिक्षण, नोकरीसाठी बाहेर गावातून येणाऱ्या महिलांची संख्या मोठी आहे. पुण्याला आज आयटी हब म्हणून ओळखले जाते. आज संपूर्ण देशातून तरुणी पुण्यामध्ये येत आहेत. हे लक्षात घेऊन बाणेर येथे सुसज्ज, अत्याधुनिक वर्किंग वुमन वसतिगृह बांधून पूर्ण करण्याचा त्यांचा प्रयत्न आणि संकल्प आहे. महिलांच्या सुरक्षिततेची काळजी असणाऱ्या अध्यक्षा महिला व बालकल्याण समितीला लाभल्या ही अभिमानास्पद अशी गोष्ट आहे. महिलाच महिलांच्या सुरक्षेबाबत किती जागृत असू शकतात याचे बोलते चालते उदाहरण म्हणजे प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे होय. महिला आणि बाल विकास या दोन क्षेत्रांपुरतेच त्यांचे काम मर्यादित नाही तर पुणे शहराचा विकास करायचा या ध्यासाने विविध क्षेत्रात त्या काम करत आहेत.

देशातील पहिली एव्हिएशन गॅलरी त्यांनी पूर्णत्वास नेली असून त्यातून हवाई वाहतूक क्षेत्रातील करिअरच्या संधींची माहिती पुणेकरांना विशेषत: शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना मिळणार आहे. मुद्रण महर्षी मामाराव दाते मुद्रणालयाच्या जागी पाच मजली नवीन इमारत उभारून पुणे शहरातील महापालिकेची पहिली स्वतंत्र ई लायब्ररी व स्पर्धा परीक्षा केंद्र चालू करण्यासाठी त्यांनी स्वतः पुढाकार घेतला. स्वत: शिक्षण क्षेत्रात काम केल्यामुळे त्यांची ही दृष्टी विद्यार्थ्यांचा विकास घडवणारी आहे हे आपल्या लक्षात येते. जंगली महाराज रस्त्यावरील वाहन पार्किंगची समस्या सोडविण्यासाठी रेव्हेन्यू कॉलनी येथे वाहनतळ उभारण्यासाठी नुकतीच तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे रेव्हेन्यू कॉलनी, जंगली महाराज रस्ता परिसरातील नागरिकांची सोय होणार आहे. त्यावर रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्पही बसवण्यासाठीही त्या प्रयत्नशील आहेत. प्रभागातील तरुण विद्यार्थी वर्गासाठी आधुनिक व्यायामशाळा त्यांनी

उभारली आहे. इतर ठिकाणीही व्यायामशाळा विकसित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मनपा शाळा, इमारतीमध्ये स्वच्छ पाणी मिळण्यासाठी वॉटर प्युरिफायर व कुलर बसवले आहेत. प्लास्टिक मुक्तीसाठी कापडी पिशव्यांचे वाटप, स्वच्छ भारत अभियान, कचरामुक्त प्रभागासाठी ओला व सुका कचरा वर्गीकरण, कचरावेचकांना ढकलगाड्या, बकेट दिल्या.

आरोग्य तपासणी, रक्तदान, अवयव दान शिबिर, वाहतूक जनजागृती या विषयावर त्यांनी विविध उपक्रम राबवले . पोलीस लाईन वसाहतीतील तरुणांसाठी त्यांनी समुपदेशन शिबिरे घेतली. विद्यार्थ्यांमधील क्रीडागुणांना वाव मिळावा यासाठी त्या सतत प्रयत्नशील असतात कलेक्शन ॲन्ड डोनेशन कॅम्पेन हा अनोखा उपक्रम त्यांनी राबवला. सर्व वयोगटातील लोकांसाठी नवे-जुने कपडे, बेडशीट ब्लँकेटस, स्टेशनरी, खेळणी, पुस्तके संकलित करून आर्थिकदृष्ट्या कमकुवत गटाला त्याचे वाटप केले. एवढेच नाही तर पर्यावरण संवर्धनासाठी ही त्यांनी पुढाकार घेतला असून ई-कचरा संकलन करून त्याचा पुनर्वापर होईल यावरही लक्ष दिलेले आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात शेतकरी वर्गाकडे कोणतेही दुर्लक्ष होऊ नये या हेतूने शेतकऱ्यांसाठी जनजागृतीचे कार्यक्रम त्यांनी हाती घेतले. यामध्ये शेतकऱ्यांनी अधिकाधिक जैविक खताचा वापर करावा, माती परीक्षणाचे महत्त्व, रासायनिक खतांचा तोटा, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या अनुषंगाने शेतकऱ्यांना प्रशिक्षण मिळावे म्हणून त्यांनी प्रयत्न केले. महिला सुरक्षा व सक्षमीकरणाबाबत त्या अत्यंत जागरूक आहेत. साबण, परफ्युम व इतर गोष्टी बनवण्याचे प्रशिक्षण गृहिणींसाठी देण्याबाबत त्यांनी पुढाकार घेतला. आजवर पंधराशे महिलांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला आहे. सद्य:स्थितीचा आणि भविष्याचा वेध घेताना नैसर्गिक इंधन साधनांच्या वापराला त्या नेहमीच प्राधान्य देत आहेत. त्यासाठी त्या सर्वांना प्रोत्साहन देतात. सांडपाणी, व्हर्मिकल्चर, बायोगॅस, ऊर्जा संवर्धन, ग्रीन ऑडिट, स्ट्रक्चरल ऑडिट, एनर्जी ऑडिट, सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन असे प्रकल्प त्यांनी यशस्वीपणे राबवले आहेत. पुणे महानगरपालिकेच्या महिला आणि बालकल्याण समितीच्या अध्यक्ष, मॉडेल कॉलनी डेक्कन जिमखाना प्रभागाच्या नगरसेविका या जबाबदाऱ्यासोबतच एक कार्यक्षम, संवेदनशील महिला, उच्चविद्याविभूषित व्यक्तिमत्त्व असे अनेक आयाम या व्यक्तिमत्त्वाला लाभले आहेत. सामाजिक बांधीलकीची भावना कायम जपत त्यांनी समाजातील तळागाळातील माणसाच्या विकासाचा विचारही केला. आपल्या पदाचा उपयोग हा तळागाळातील व्यक्तींसाठी झाला पाहिजे ही भावना त्यांच्या प्रत्येक कामाच्या मुळाशी असते. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय अशा सर्वच क्षेत्रात सहजपणे काम करणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाला आमचा मनापासून सलाम !



# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य

**- डॉ. दत्तात्रय चौधरी**

मल्हारराव होळकरांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात दाभाडयाचा एक सरदार कंठाजी कदबबांडे यांच्या पेंढरी टोळीतून केली. शिपाईगिरी करत असताना तरुण बाजीराव पेशवा यांच्याबरोबर खास मैत्री जुळन आली. आणि आपल्या पराक्रमाच्या जोरावर इ.स.१७२९ च्यासुमारास त्यांना माळवा प्रांताची सुभेदारी मिळाली. भोजराजमामाची मुलगी गौतमी हिच्याबरोबर मल्हाररावाहचा विवाह झाला. आणि त्यांना एक पुत्र झाला त्यांचे नाव खंडेराव ठेवण्यात आले. जेजुरीच्या खंडेरायाच्या. कृपादृष्टीमुळे आपली प्रगती झाली असल्याची मल्हाररावांची धारणा होती. त्यामुळेच त्यांनी सुभेदारी मिळाल्याबरोबर कुलोपाध्ये नेमले व मंदिराचा बांधकाम करण्याचा घाट घातला. उत्तरोत्तर मल्हाररावाची प्रगती होत होती. उत्तर हिंदुस्थानाच्या राजकारणात मल्हाररावाचा दबदबा निर्माण झाला होता. मल्हाराव होळकर व राणोजी शिंदे हे सुरूवातीस जिवलग मित्र होते. उत्तर हिंदुस्थान या दोघांनी गाजवून सोडला होता. मोगल बदशाहाचे वजीर व सरदार या दोघांना टरकून असत. आब्दालीच्या तीन स्वाऱ्या झाल्यानंतर मराठेच आता बादशाहीचे रक्षण करू शकतील एवढा विश्वास बादशाहाच्या मनात निर्माण झाला होता. तिसऱ्या स्वारी नंतर त्याचे डोळे उघडले आणि त्यांनी सफदरजंग या वजीर मार्फत त्यांनी कनोज येथे होळकर व शिंदेंशी दिल्लीच्या तख्ताच्या रक्षणाचा करार २७ मार्च १७५२ केला. होळकर व शिंदेनी जरी हा करार पेशव्यांचा प्रतिनिधी म्हणून केला असला तरी दोघा प्रबळ सरदाराचे सामर्थ्य पाहूनच बादशहा हा करार करायला प्रेरित झाला होता. जयाजी शिंदेचा बिजोसिंगाने केलेला खून आणि कुंभेरच्या लढ्यात खंडेराव होळकरांचा झालेला अपघाती मृत्यू या प्रकरणांमुळे शिंदे -होळकरात वैमनस्य निर्माण झाले. १४ जानेवारी १७६१ पाणिपतच्या युद्धात मल्हाराव रणागंण सोडून गेल्याचा आक्षेप घेतला जातो. पाणिपतनंतर मराठेशाहीची बिघडलेली घडी बसविण्यात माधवराव पेशव्यांबरोबर मल्हाररावाने पुढाकार घेतला होता.

**बालपण -** बाजीराव पेशव्यांचे एक सरदार मल्हारराव होळकर व मावळ प्रांताचे जहागिरदार होते. ते पुण्यास जाताना चौंडीस थांबले आणि